पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर यांचे कार्यालय,
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेबआंबेडकर रोड,औरंगाबाद-431001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ईमेल-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

जा. क्र./विशा-१/सो/कार्यक्रम/सभा-परवानगी/२०२२- 1649 औरंगाबाद शहर. दिनांक २८/०४/२०२२.

**विषय :-** दि. ०१/०५/२०२२ रोजी आयोजीत जाहीर सभा परवानगी बाबत.
**संदर्भ :-** राजीव हरिचंद्र जावळीकर, जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, औरंगाबाद
मो.नं. ९५०७७७५९७७, ९५८८६७३२८० यांचा दिनांक १९/०४/२०२२ रोजीचा अर्ज.

******

त्या अर्थी आपण दिनांक ०१/०५/२०२२ रोजी १६.३० ते २१.४५ वाजे पावेतो महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा. राजसाहेब ठाकरे यांची जाहिर सभा सांस्कृतीक क्रिडा मंडळ मैदान, खडकेश्वर येथे होणार असुन होऊ घातलेल्या सभेस परवानगी देवुन उपकृत करावे अशी विनंती केली आहे.

त्या अर्थी मला महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ कलम ३७(१)(३) अन्वये प्राप्त अधिकारा नुसार, आपणास दिनांक ०१/०५/२०२२ रोजी १६.३० ते २१.४५ वाजे पर्यंत सांस्कृतीक क्रिडा मंडळ मैदान, खडकेश्वर, औरंगाबाद येथे जाहीर सभेला खालील अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

**अटी :-**

१. सदर जाहीर सभा दिनांक ०१/०५/२०२२ रोजी १६.३० ते २१.४५ या वेळेतच आयोजीत करावी. कार्यक्रमाचे ठिकाण व वेळेत कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.
२. सभेत सहभागी होणाऱ्या नागरिकांनी स्वयंशिस्त पाळावी. सभेला येतांना व परत जातांना कोणीही आक्षेपार्ह घोषणाबाजी, हुल्लडबाजी, असभ्य वर्तन करणार नाही याची दक्षता घ्यावी.
३. दिलेल्या मार्गानेच प्रवास करण्याचा व मार्ग न बदलण्याच्या सभे साठी योलावलेल्या सर्व वाहनांना पोलीसांनी सुचना द्याव्या. त्या वाहनांनी शहरात व शहरा बाहेर प्रवासा दरम्यान त्या त्या रस्त्यावर विहीत वेगमर्यादेचे पालन करावे. सभेला आलेल्या नागरीकांना त्यांचे वाहने ( दोन चाकी, चार चाकी व इतर कोणतेही वाहन ) पार्कीगसाठी निर्धारीत केलेल्या ठिकाणीच पार्कींग करण्याच्या सुचना द्याव्यात. सभेसाठी येतांना अथवा परत जातांना कोणत्याही प्रकारे मोटारसायकल, कार रॅली काढु नये. त्याच प्रमाणे श्री. राज ठाकरे यांना अधिकृत सुरक्षा पुरविण्यात आली असुन आयोजकांनी त्यांच्या सभेच्या ठिकाणी येण्याच्या व सभेवरुन परत जाण्याच्या वेळी कोणतीही रॅली काढु नये.
४. कार्यक्रमा दरम्यान कोणतेही शस्त्र, तलवारी, स्फोटक पदार्थ बाळगु नये अगर प्रदर्शन करु नये व शस्त्र अधिनियमातील तरतुदीचा भंग करु नये.
५. अट क्र. २,३,४ बाबत सभेत सहभागी होणाऱ्या नागरीकांना कळविण्याची जबाबदारी संयोजकांची राहील.
६. सदर कार्यक्रमात स्वयंसेवक नेमण्यात यावेत. त्यांची नावे, मोबाईल नंबर तसेच सभेसाठी औरंगाबाद शहराच्या बाहेरुन निमंत्रीत करण्यात आलेल्या नागरीकांच्या वाहनांची शहर / गावांना अनुसरुन संख्या, त्यांचा येण्याचा व जाण्याचा मार्ग, येणाऱ्या लोकांची अंदाजे संख्या ही माहीती सभेच्या एक दिवस अगोदर पोलीस निरीक्षक सिटीचौक यांचे कडे द्यावी.
७. सभा स्थानाची आसन व्यवस्था कमाल मर्यादा १५,००० इतकी असल्यामुळे त्याठिकाणी १५,००० पेक्षा जास्त लोकांना निमंत्रीत करु नये. अशा प्रकारे क्षमतेपेक्षा अधिक लोकांना निमंत्रित करुन काही ढकला ढकली, अव्यवस्था, गोंधळ, चेंगराचेंगरी निर्माण झाल्यास संयोजकांना जबाबदार धरले जाईल.
८. सभास्थानी सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसांनी निर्देशीत केलेल्या ठिकाणी मजबुत बॅरीकेटस उभारावे. सभेसाठी येणाऱ्या प्रत्येक नागरीकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने योग्य ती तपासणी (Frisking) करण्याचा अधिकार पोलीसांना राहील. यामध्ये कोणत्याही प्रकारचा व्यत्यय होणार नाही याची दक्षता घ्यावी.
९. सभेदरम्यान कोणत्याही प्रकारे वंश, जात, भाषा, वर्ण, प्रदेश, जन्मस्थान, धर्म इत्यादी किंवा ते पाळत असणाऱ्या प्रथा/परंपरा या वरुन कोणत्याही व्यक्ती व समुदायाचा अपमान होणार नाही अगर त्यांविरुध्द चिथावणी दिली



Scanned with CamScanner

नागार नाही अशी कृती, वक्तव्ये, घोषणाबाजी कोणीही करणार नाही, याची आयोजक व वक्त्यांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी.

१०. सभेसाठी वापरण्यात येणाऱ्या ध्वनिक्षेपका बाबत मा.सर्वोच्च न्यायालय निर्देश व ध्वनिप्रदुण (नियंत्रण व नियमन) नियम २००० नुसार परिशिष्ट नियम ३(१), ४(१)अन्वये

| क्षेत्र | दिवसा ( ०६.०० ते २२.०० वा. ) |
|---|---|
| औद्योगिक क्षेत्र | ७५ डेसीबल |
| व्यापारी क्षेत्र | ६५ डेसीबल |
| निवासी क्षेत्र | ५५ डेसीबल |
| शांतता क्षेत्र | ५० डेसीबल |

वरील प्रमाणे आवाजाची मर्यादा असावी. वरील अटींचा भंग केल्यास पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या कलम १५ अन्वये ५ वर्ष इतक्या मुदतीच्या तुरुंगवासाची आणि रु. १,००,०००/- ( एक लाख फक्त) इतक्या दंडाची शिक्षा होऊ शकते.

११. सदर कार्यक्रमा दरम्यान कुठल्याही अत्यावश्यक सुविधा उदा. शहर बस सेवा, अॅम्बुलन्स, दवाखाना, मेडीकल, विजपुरवठा, पाणीपुरवठा, दळण-वळण यांना बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी.

१२. सभेच्या दिवशी वाहतुक नियमनासाठी या कार्यालया कडुन काढली जाणारी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३६ अन्वयेची अधिसुचना सर्व संयोजक, वक्ते व सभेला येणाऱ्या नागरीकांना बंधनकारक राहील.

१३. सभेसाठी येणाऱ्या महिला व पुरुषासाठी स्वतंत्र आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी व स्वतंत्र स्वच्छतागृहची व्यवस्था करावी.

१४. सभेसाठी वापरण्यात येणारी विद्युत यंत्रणा, बॅरिकेट्स, मंडप, ध्वनिक्षेपक सुस्थीतीत असल्याची खात्री करावी व विद्युत यंत्रणेमध्ये काही बिघाड झाल्यास पर्यायी विद्युत यंत्रणेची ( जनरेटरची ) व्यवस्था अगोदरच करावी.

१५. सदर कार्यक्रमा दरम्यान मिठाई व अन्नदान वाटप होत असल्यास अन्न व मिठाईतुन कोणासही विषबाधा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१६. हा कार्यक्रम सुव्यवस्थीत पणे पार पाडण्यासाठी आपणास घालुन दिलेल्या उपरोक्त अटींचे व शर्तीचे उल्लंघन केल्यास कार्यक्रमाचे सर्व संयोजक व वक्ते यांच्यावर प्रचलित विधी, उपविधी व नियमानुसार कारवाई केली जाईल व अशा कारवाई दरम्यान ही नोटीस मा. न्यायालयात पुरावा म्हणुन वापरली जाईल याची नोंद घ्यावी. जा.क्र.विशा-५/आदेश/औ.बाद/२०२२-१५७५ औरंगाबाद शहर दिनांक २२/०४/२०२२ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७(१)(३) अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशाला अनुसरुन ही परवानगी देण्यात येत आहे. सदर आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. त्याचे पालन करण्यात यावे.

हो नोटीस आज दिनांक २८/०४/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिली.

२८/४/२२

निखील गुप्ता (भापोसे)
पोलीस आयक्त औरंगाबाद शहर

प्रति,

राजीव हरिचंद्र जावळीकर, जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, औरंगाबाद मो.नं. ७५०७७७५९७७, ९५८८६७३२८०

प्रत कार्यवाहीस्तव :

१) सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर.
२) सर्व पो.स्टे. / शाखा प्रभारी अधिकारी, औरंगाबाद शहर.

प्रत माहितीस्तव :

पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, परिमंडळ १ व २, औरंगाबाद शहर.

प्रत सविनय सादर :

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा. अपर पोलीस महासंचालक, का. व सु. महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई.



Scanned with CamScanner